# योग विद्या गुरुकुल,नाशिक

पृष्ठ क्र.


१) स्थापना व उद्दिष्ट ---------------------- २

२) योगशिक्षक वग:------------------------ २

३) शाखा विस्तार------------------------- २

४) श्रेणीबध्द अभ्यासक्रम------------------ २

५) इतर अभ्यासक्रम:--------------------- २

६) योग विद्या गुरुकुल--------------------- ३

७) निसर्गोपचार अभ्यासक्रम----------------- ३

८) योग व निसर्गोपचार केंद्र----------------- ३

९) संस्थेचे अन्य कार्यक्रम------------------ ३

१०) योग स्पर्धा------------------------- ४

११) योगगीते -------------------------- ४

१२)प्रकाशित साहित्य---------------------- ४

१३) यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ शिक्षक अभ्यासक्रम-- ४

१४) विश्वयोगदर्शन, तळवाडे, त्र्यंबक------------- ४

१५) योग शिक्षक वर्ग (इंग्रजी)---------------- ५

१६) ध्यान वर्ग-------------------------- ५

१७) इतर वर्ग--------------------------- ५

१८) सेवाकार्य -------------------------- ५

१९) राष्ट्रीय योग व संशोधन संमेलन:------------- ५

२०) शासन मान्यता----------------------- ५

२१) मुक्त विद्यापीठ मान्यता------------------ ५

२२) पुणे विद्यापीठ मान्यता ------------------ ५

२३) निसर्गोपचार व योग प्रमाणपत्र वर्ग मान्यता ------ ६

२४) केंद्रशासन मान्यता--------------------- ६

२५) संशोधन विभाग --------------------- ६

२६) योग विद्या गुरूकुलचे शासन मान्यता प्राप्त अभ्यासक्रम- ६

२७) मुरारजी नॅशनल इंस्टियुट ऑफ योगा मान्यता------ ७

**स्थापना व उद्दिष्ट :** जगभर योग शास्त्रासारख्या अत्यंत महत्त्वाच्या शास्त्राचा प्रचार करण्याच्या दृष्टीने १९६० साली वैद्यराज कै.बाळासाहेब लावगनकर यांनी योग विद्या धाम या संस्थेची स्थापना केली. त्यानंतर योगाचार्य विश्वास मंडलीक यांच्या अथक प्रयत्नातून बावन्न वर्षानंतर आज १५९ विविध शहरातील आणि प्रांतातील शाखांमधून योगशास्त्राचा प्रचार झालेला आहे. नाशिक येथे १९८३ साली एप्रिल महिन्यात घेतलेल्या पहिल्या 'योगशिक्षक' वर्गामधून तयार झालेल्या शिक्षक आणि कार्यकर्त्यांच्या आधाराने संस्थेच्या कार्याने जी भरारी घेतली ती आजतागायत चढत्या क्रमाने चालूच आहे. यात योगाचार्यांनी प्रस्तुत संस्थेचे कार्य महाराष्ट्रभर आणि भारतातील अन्य काही प्रांतात पसरविण्याच्या दृष्टीने अथक परिश्रम केलेले आहेत.

योगशास्त्राच्या प्रचार आणि प्रसाराचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून, संस्था, योगशास्त्राचे पायाभूत व शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याचे कार्य करते. ''सोप्याकडून अवघडाकडे'' हा मूळ मंत्र मानून साधकांना योगाभ्यासाची गोडी लागावी आणि त्यांनी सहजतेने प्रगती साधावी असे अभ्यासक्रम संस्थेने तयार केलेले आहेत. संस्थेने संशोधनाच्या विभागातही कार्य सुरु केले आणि शिक्षण प्रणालीमध्ये कार्यकर्त्यांशी विचार विनिमय करून आवश्यक बदलासह ही प्रक्रिया अधिक सोपी व परिणामकारक करण्याकडे वाटचाल केली. योग संन्यासांकरिता नसून सर्वसामान्य जनतेकरिता आहे हा समज समाजात दृढ केला.

**योगशिक्षक वर्ग:** योगाचार्य विश्वास मंडलीक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेला एक एक शिक्षक कार्यकर्ता ही एक चालती बोलती संस्थाच आहे. कार्यकर्त्यांशी आणि शिक्षकांशी सातत्याने संपर्क साधून त्यांना प्रेरणा देतांना आज निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या १०,००० शिक्षकांची फळी उभारली आहे.

योग शिक्षणाचा प्रचार लक्षात घेता 'योगशिक्षक निवासी वर्ग' आता निरनिराळ्या मोठ्या आणि सक्षम शाखांमधूनही होतात, असे बरेच निवासी वर्ग कोल्हापूर, अ.नगर, औरंगाबाद, डोंबिवली, पुणे, पिंपरी-चिंचवड, गोवा, नांदेड, होजाई (आसाम) येथे होत आहेत.

**शाखा विस्तार:** १२ जुलै १९९८ रोजी उस्मानाबाद (धाराशीव) येथे १०० वी शाखेचे उद्‌घाटन करतेवेळी 'सहस्त्र शाखेकडे' वाटचाल करण्याची घोषणा योगाचार्यांनी करून या ५ वर्षात आणखी ५० शाखा महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर (कर्नाटक, गोवा, मध्यप्रदेश, गुजरात व पूर्वांचल आसाम) काढल्या.

**श्रेणीबध्द अभ्यासक्रम:** योग विद्या धामने योग शिक्षणाची एक स्वतंत्र शैली निर्माण करतांना योगाचार्यांनी श्रेणीबध्द अभ्यासक्रम तयार केले. साधकाच्या व्यक्तीगत प्रगतीसाठी योगप्रवेश, योग परिचय, योग प्रबोध, योग प्रवीण आणि योग पंडित या पाच वर्गांची रचना केली, तर समाजकार्यात व योगप्रचार कार्यात रूचि बाळगणाऱ्या साधकांकरिता योगशिक्षक, योग अध्यापक आणि योग प्राध्यापक अशा तीन अभ्यासक्रमाची रचना केली, असे श्रेणीबध्द 'आठ प्रकारचे म्हणजेच अष्टवर्ग' देणारी ही संपूर्ण भारतात एकमेव अशी संस्था आहे.

योग विद्या धाममध्ये योगाभ्यास शिकविण्याकरिता 'श्रेणीबध्द अभ्यासक्रमांची रचना व्हावी हा मोठा सुंदर योगायोग साधल्यामुळे श्री पतंजलींच्या 'अष्टांग' योगाशी या 'आठवर्गांची तुलना' करण्याचा मोह होतो आणि या २१ व्या शतकात हे कार्य उभे करणाऱ्यामध्ये पतंजलींचे दर्शन घडते असे वाटते.

**इतर अभ्यासक्रम:** योग शिक्षण, प्रशिक्षण आणि शिक्षक, प्रशिक्षण या वर्गा व्यतिरिक्त गरजेनुसार उपचारात्मक वर्ग किंवा शिबिरे घेतली जातात. उदा.उच्चरक्त दाब निवारण, मधुमेह निवारण, हृदय रोग निवारण, स्थूलता निवारण, पाठदुखी निवारण, व्यसनमुक्ती शिबिर, प्रसूतीपूर्व शिबिर, टॉन्सिलायटीस निवारण वर्ग.

आसनांच्या वर्गाच्या जोडीला प्राणायाम वर्ग, ध्यानवर्ग, योगनिद्रा वर्ग, प्रणव जप वर्ग, उंचीसंवर्धन वर्ग, इत्यादी वर्ग घेतले जातात. यापैकी पुढील विशेष अभ्यासक्रम अत्यंत परिणामकारक व लोकप्रिय झालेले आहेत.

**∗ उंची संवर्धन अभ्यासक्रम –** या अभ्यासक्रमांतून एका महिन्यात सरासरी २० मि.मि. उंची वाढते असा अनुभव आहे.

**∗ आर्तवदोष निवारण अभ्यासक्रम –** रोज एक तास याप्रमाणे तीन महिने चालणाऱ्या या अभ्यासक्रमांतून महिलांच्या मासिक पाळीच्या तक्रारी ९०% दूर होतात असे सिध्द झाले आहे.

**∗ S.S.S. (Slim and Smart Sadhana)** (अर्थातच स्थूलता निवारण)– रोज २ तास याप्रमाणे तीन सप्ताहाच्या या अभ्यासक्रमांतून सरासरी तीन किलोग्रॅम वजन कमी होते असा अनुभव आहे. जास्तीतजास्त ९ किलोग्रॅम वजन कमी झाल्याची नोंद आहे.

**∗ S.D.S. (Stop Diabetes Sadhana) (मधुमेह निवारण)–** दोन तास याप्रमाणे तीन आठवडे चालणाऱ्या या अभ्यासक्रमातून इन्शुलिन व मधुमेहाच्या तक्रारी हळूहळू कमी होऊन बंद होतात असा अनुभव आहे.

**∗ S.Y.H. Strengthen Your Heart (हृदय रोग निवारण)–** रोज चार तास याप्रमाणे दहा दिवस चालणारा हा अभ्यासक्रम हृदय विकाराच्या रुग्णांना त्यातून मुक्तीचा मार्ग दाखवणारा व हृदयविकार होऊ नये म्हणून मार्गदर्शन करणारा आहे.

**∗ S. P. S.(Shatkarma – Panchakarma Shibir)** पाच दिवसाच्या या अभ्यासक्रमात आयुर्वेदातील पंचकर्मे व योगातील षटकर्मे योग्य मार्गदर्शनाखाली शिकविली जातात. शरीर स्वास्थ्याला या साधनेचा चांगला उपयोग होतो म्हणून या शिबिरालाही चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

**∗ S. O. C. ( Success Over Cancer ) --** कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाशी सक्षमपणे झुंझ देण्याकरिता योगसाधनेचा फार चांगला उपयोग होतो. याकरिता एक अभ्यासक्रम तयार केलेला असून तो या रुग्णांना या विकाराशी यशस्वीपणे तोंड देण्यास निश्चीतच उपयोगी पडत आहे. या अभ्यासामुळे प्रचलित वैद्यकीय उपचारांचे दुष्परिणामही कमी केले जातात.

**योग विद्या गुरूकुल:** वरील निरनिराळे अभ्यासक्रम राबविण्याकरिता वर्ष प्रतिपदा १४ एप्रिल १९८३ रोजी ‘योग विद्यापीठ’ ही संस्था स्थापना झाली. हे विद्यापीठ ‘योग विद्या गुरुकुल’ या पंजीकृत संस्थे अंतर्गत कार्य करते. प्रत्येक शाखेतील ‘परीक्षा प्रमुख’ व प्रत्येक विभागातील ‘परिक्षा संचालक’ हे विद्यापीठातील ‘परीक्षा नियंत्रक’ ह्यांच्या मार्गदर्शना खाली कार्य करतात. विद्यापीठाचे ‘कुलगुरू’ म्हणून योगाचार्य श्री. विश्वास मंडलीक कार्य पाहतात.

**निसर्गोपचार अभ्यासक्रम:** विद्यापीठामार्फत निसर्गोपचार प्रमाणपत्र अभ्यासक्रम (छ.उ.) तसेच निसर्गोपचार डिप्लोमा (छ.ऊ) अभ्यासक्रम दूरशिक्षणतंत्राच्या आधारे राबविले जातात.

**योग व निसर्गोपचार केंद्र:** योगाभ्यासाचा चांगला ‘साईड इफेक्ट’ म्हणजे विकार मुक्ती. म्हणून योगाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर उपचार पध्दतीसारखा होत आहे. बरेच असाध्य विकार, योग आणि निसर्गोपचाराच्या सहाय्याने बरे होऊ शकतात. याकरिता संस्थेतर्फे योग व निसर्गोपचार केंद्रे चालविली जातात. नाशिकमध्ये योगभवन येथे अनिवासी स्वरूपात व नाशिक रोड व जेलरोड येथे निवासी स्वरूपात ही केंद्रे चालवली जातात.

योग विद्याधामचे योग–निसर्गोपचार केंद्राचे चाललेले समाजोपयोगी कार्य पाहून नाशिक महानगर पालिकेने त्यांचे नवीन बांधलेले नाशिकरोडचे ‘आरोग्यधाम योग व निसर्गोपचार केंद्र’(२५ रुग्णांचे (बेडचे) रुग्णालय) या संस्थेला २००२ मध्ये चालविण्यास दिलेले आहे. गेली दहा वर्षे ते यशस्वीपणे चालविले जात आहे.

याशिवाय पीची फिप्सन सॅनीटोरीयम या मुंबईच्या संस्थेने जेलरोड येथे ५० रुग्णांचे (बेडचे) अद्ययावत असे ‘रुग्णालय’ बांधलेले असून तेही २००९पासून संस्थेला चालवायला दिलेले आहे. गेली तीन वर्षे ते यशस्वीपणे चालविले जात आहे.

नाशिक मधील सर्व उपचार केंद्रातून योगाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत ३०००० रुग्णावर उपचार झाले असून ते विकार मुक्त झाले आहेत. योग विद्या धामचे प्रशिक्षित योग अध्यापक, छ.उ. आणि छ.ऊ झालेले तज्ञ ही योग निसर्गोपचार केंद्रें निरपेक्षेतने चालवित आहेत. नाशिक, कोल्हापूर पुणे, चिंचवड, अ.नगर, औरंगाबाद, नांदेड, हुपरी, गडहिंग्लज, डोंबिवली, धुळे, अंबरनाथ, आणि होजाई(आसाम)येथे योग व निसर्गोपचार केंद्रे (अनिवासी)कार्यरत आहेत.

**संस्थेचे अन्य कार्यक्रम:** योगाचा प्रचार आणि प्रसार समाजात प्रभाविपणे व्हावा व नागरिकांमध्ये योगाची आवड निर्माण व्हावी यासाठी कमी कालावधीच्या एकदिवसीय (५/६ तासांच्या) निरनिराळ्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्याद्वारे नागरिकांच्या जीवनात आंनद निर्माण व्हावा व त्याचबरोबर स्थानिक शाखांना आर्थिक साह्य मिळून त्या आणखी कार्यक्षम व्हाव्यात याकरिता आयोजित केलेल्या या कार्यशाळा अधिक लोकप्रिय होत आहेत.

१) अमृतयोग साधना २)निसर्गधारा ३) तणावमुक्ती कार्यशाळा (डीींशीी चरपरसशाशपीं थीज्ञीहेी) ४) योग निसर्गदर्शन व्याख्यान माला ५) मन करारे प्रसन्न ६) आरोग्यम् धन संपदा ७) चैतन्य योग साधना ८) दिव्यत्वाची जेथ प्रचिती इत्यादी.

याशिवाय योगप्रचारासाठी पुढीलप्रकारचे (काहीसे मनोरंजनात्मक) कार्यक्रमही सादर केले जातात.

१) योग कीर्तन २) जाहीर योगासन प्रात्याक्षिके

३) योग गीतातून योगदर्शन ४) योग नाट्य ५) योगनृत्य

तसेच तेजस्वी युवा शिबिर, शंखप्रक्षालन शिबिर, शुध्दिक्रिया शिबिर, आठ दिवसीय उपचार शिबिर अशा शिबिरातूनही योगप्रचार साधला जातो.

**योग स्पर्धा:** याशिवाय दरवर्षी पुढील प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात

१) विद्यालयीन व महा-विद्यालयीन विद्यार्थ्यांकरता योगासन स्पर्धा

२) योग शिक्षकांकरिता योग गीत स्पर्धा.

३) योग निबंध स्पर्धा

**योगगीते :**

संस्थेचे मुखपत्र योगचिंतन / योगसुगंध या मासिकातून प्रसिध्द झालेली मा. गुरूवर्य व इतर कवींनी / साधकांनी शब्दबध्द केलेली काव्ये, स्वरबध्द करून त्यांचे गायन करण्याचा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम गेल्या पंचवीस वर्षांपासून राबविला जात आहे. या गायनास उत्तेजन मिळावे म्हणून योग गीतांचे जाहीर कार्यक्रम आयोजित केले जातात व दरवर्षी योगगीतांच्या स्पर्धाही आयोजित केल्या जातात.

**प्रकाशित साहित्य: योगाचार्य विश्वास मंडलीक ह्यांच्या सिध्द हस्त लेखणीतून लिहिली गेलेली साहित्य --**

०१) योग प्रवेश ०२) योग परिचय ०३) सूर्यनमस्कार ०४) योग शिक्षक ०५) अभिरूप न्यायालयात योगशिक्षण ०६)निसर्गाची साद ०७) योगनिद्रा ०८) मुक्तचिंतन भाग- १-२ ०९)योग सोपान १०) शुध्दिक्रिया ११) अंत:स्त्रावी ग्रंथी १२) योगोपचार १३) योगबिंदू १४)विकासाची साधना १५) योगाची पार्श्वभूमी-यम नियम १६) ग्रंथपरिचय १७)विज्ञान व योग १८) योग संशोधन १९)मन: स्वास्थ्य २०) अंतरंग योग २१) पातंजल योगसूत्रे २२) प्राणायाम २३) योगासने २४) मन करारे प्रसन्न २५) योगप्रवेश दूरतंत्र भाग -१व २ २६)अष्टांग योग दर्शन २७)योग प्रबोध

२८) निसर्गोपचार प्रवेश २९) चैतन्य प्राणायाम साधना आरंभ ३०) चुंबकोपचार ३१)गुडघेदुखी ३२) विकारमुक्तीकरिता योगनिद्रा ३३) मुक्तचिंतन रूग्णांकरिता ३४)षट्चक्रदर्शन ३५) हस्तमुद्रा ३६) योग कलिका भाग - १, २ व ३ ३७) योग कलिका हिंदी भाग -१

**यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ शिक्षक अभ्यासक्रम**

३८) योगशिक्षक ३९) योगसिध्दांत ४०) योगाभ्यास ४१) शरीरशास्त्र

ही अभ्यासक्रमाकरिता लिहिलेली पुस्तके अतिशय लोकप्रिय आहेत.

तसचे इतर कार्यकर्त्यांनी लिहिलेली पुस्तकेही संस्थेने प्रकाशित केलेली आहेत...

१) दाबबिंदू - श्री. अरुण एकबोटे, नाशिक

२) पातंजल योगसूत्रे ओवीबध्द विवरण- शामला राईलकर, पुणे

३) संस्कार शिल्प - सौ. सुनिता पटवर्धन, पुणे

४) सुप्रजनन तंत्र - सौ. पौर्णिमा मंडलीक, नाशीक

५) स्वयंपाकघरातील औषधे - श्री. अनंतशास्त्री दातार, अंबरनाथ

अन्य योगासने सराव, योगनिद्रा, प्रणवोपासना इत्यादी अनेक ध्वनिमंजुषा, योगासन चार्टस इ. निरनिराळ्या प्रकारचे साहित्य संस्थेने प्रकाशित केलेले असून ते सर्व शाखा कार्यालयातून उपलब्ध आहे.

संस्थेचे मुखपत्र 'योग सुंगध मासिक: १९७९ सालापासून सलग २२ वर्षे या मासिकाचे योगाचार्यांकडून यशस्वी संपादन व प्रकाशन केले गेले. यानंतर हे संपादनाचे कार्य श्री. महेश पुरंदरे पुणे, यांनी पाच वर्षे केले. त्यानंतर सध्याच्या कार्यकारी संपादीका म्हणून श्यामला राईलकर पुणे, या काम बघत आहेत. या मासिकाद्वारे नव-नवीन साधकांना लेखनासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या मासिकातून अनेक प्रकारच्या योगविषयक लेखमाला प्रकाशित झाल्या. त्यापैकी श्यामलाताई राईलकरांची 'पातंजल योगसूत्रे' (ओवीबध्द विवरण) लेखमाला तसेच योगाचार्यांची 'अष्टांग योगदर्शन लेखमाला' म्हणजे योगाभ्यासी साधकांसाठी मेजवानीच होती.

**विश्वयोगदर्शन, तळवाडे, त्र्यंबक:**

संस्थेच्या वाढत चाललेल्या कार्यामुळे नाशिकमधील 'योगभवन' ची जागा अपुरी पडु लागली, म्हणून २००२ सालापासून संस्थेने एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला.संस्थेची कायम स्वरुपी जागा असावी, तसेच त्यात योग साधनेसाठी 'आश्रम' बांधावा, तेथे योगानुकुल वातावरण असावे अशा उद्देशाने संस्थेने नाशिकपासून २८ कि.मी.दूर

आणि त्र्यंबकेश्वर पासून ३ कि.मी.अलिकडे असा एक २५ एकरांचा विस्तृत भूखंड घेतला आहे. 'विश्वयोग दर्शन हा योग आश्रम' तेथे आकार घेत आहे.

या ठिकाणी गुरुकुल पध्दतीने निवासी स्वरुपातील योग शिक्षणाचे वर्ग सतत चालू असतात. बिहार स्कूल ऑफ योग, मुंघेर येथील परमाचार्य परमहंस स्वामी निरंजनानंद सरस्वती यांनी या आश्रमात दोन दिवस राहून या कार्याला शुभाशिर्वाद दिलेले आहेत. त्यांनी योगाचार्य श्री.विश्वास मंडलीक, सौ.पौर्णिमाताई मंडलीक व श्री गंधार मंडलीक या तिघांनाही ऋषिपरंपरेची दीक्षा दिलेली आहे. त्यामुळे स्वामीजींच्या आदेशाप्रमाणे प्रामुख्याने दर शनिवारी (आणि आता रोजच) महामृत्युंजय मंत्राचे हवन चालू असते. याशिवाय प्रत्येक एकादशीला संपूर्ण गीतापाठ व प्रत्येक पौर्णिमेला सुंदरकांडाचा पाठ केला जातो.

**योग शिक्षक वर्ग (इंग्रजी):** या आश्रमांत दरमहा विदेशी साधकांकरिता एक योगशिक्षक वर्ग (इंग्रजीतून) चालवला जातो. साधारणत: ३० ते ४० साधक प्रत्येक वर्गात असतात. हा वर्ग पूर्ण केलेल्या साधकांकरिता प्रगत योगवर्ग व योगोपचार प्रशिक्षण वर्गही चालवला जातो. या वर्गाचे काही विदेशी विद्यार्थी स्वयंसेवक म्हणूनही आश्रमात सेवा देत असतात. इंग्रजी वर्गाचे कार्य हे गुरूजींचे चिरंजीव श्री. गंधार मंडलीक आणि गुरूजींची सून सौ. भक्तीरत्ना मंडलीक हे बघत असतात. तसेच त्यांनी निर्माण केलेली ुेसरेलिपीं.लो या वेबसाईटमुळे हे काम जोमाने चालू आहे.

**ध्यान वर्ग:** देशी व परदेशी साधकांसाठी आश्रमात चैतन्य ध्यान साधनेचे वर्ग सातत्याने चालू असतात. फक्त सहा दिवसांचे हे ध्यान वर्ग पूर्णपणे विनामूल्य असतात.

**इतर वर्ग:** याशिवाय संस्थेचे योग प्रवीण, योग पंडित, योग प्राध्यापक असे प्रगत अभ्यास वर्ग ही आश्रमात नियमितपणे चालू असतात.

**सेवाकार्य:** आश्रमाच्या आजुबाजूला सर्व आदिवासी विभाग परसलेला आहे. त्यामुळे या क्षेत्रात आश्रमाच्या वतीने महिन्यातून दोन वेळा असे सतत सेवा कार्य चालू आहे. गरजूंना आश्रमाकडून भेट म्हणून कपडे, चादरी, रग, स्वेटर्स, छत्र्या यांचे वाटप सतत केले जाते.

नाशिक शहरातील काही तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने निरनिराळ्या खेड्यापाड्यातून रुग्णांची मोफत तपासणी करून, औषधे देण्याची व्यवस्थाही आश्रमाने केली आहे.

त्याशिवाय काही खेड्यातून विहीर बांधून देणे, मंदिराचा जीर्णोध्दार करणे, समाजमंदिरांची दुरूस्ती करणे, शाळांमधील विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, कपडे यांचे वाटप करणे, सूर्यनमस्कार स्पर्धा घेणे अशी अनेक सेवाकार्ये अणि योगप्रचार कार्ये सतत चालू असतात.

## राष्ट्रीय योग व संशोधन संमेलन:

संस्थेच्यावतीने २००७ सालापासून, दरवर्षी डिसेंबर महिन्यात मराष्ट्रीय योग व संशोधन संमेलनफ आयोजित केले जाते. हे संमेलन तीन दिवस चालते. दरवर्षी पाचशेच्या आसपास योग कार्यकर्ते या संमेलनाचा आनंद घेत असतात.

प्रत्येक संमेलनात एखादा विशेष विषय निवडून त्यावर अनेक तज्ञांचे मार्गदर्शन आतापर्यंत आयोजित केले गेले आहे. ङ्घयोग साहित्य संमेलनङ्क, ङ्घयोग व संशोधनङ्क, ङ्घध्यान साधनाङ्क, ङ्घसिध्दि व चमत्कारङ्क ङ्घश्रीमद् भगवद्गीताङ्क अशा विषयांवर संमेलने आयोजित केलेली आहेत. याचबरोबर या संमेलनात अनेक संशोधन प्रकल्पांचे सादरीकरणही केले जाते.

## शासन मान्यता:

संस्थेच्या योग प्रवेश, योग परिचय (C.Y.Sc.), योग प्रबोध, योग प्रवीण (D.Y.Sc.), योग पंडित (B.Y.Sc.), या शैक्षणिक अभ्यासक्रमांस व योगमार्गदर्शक (C.Y.Ed), योग शिक्षक (D.Y.Ed) व योग अध्यापक (B.Y.Ed) या योग प्रशिक्षण अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे

## मुक्त विद्यापीठ मान्यता:

संस्थेला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने (ऊध.एव) हा अभ्यासक्रम चालवण्याकरता मान्यता दिलेली आहे.

## पुणे विद्यापीठ मान्यता :

संस्थेला २००९ सालापासून पुणे विद्यापीठाची योग संशोधन संस्था म्हणून मान्यता मिळालेली आहे. या अंतर्गत आधुनिक विज्ञान आणि योग याबाबत संशोधन केले जाते.

### निसर्गोपचार व योग प्रमाणपत्र वर्ग मान्यता :

महाराष्ट्र शासनाच्या टेक्नीकल बोर्डाने निसर्गोपचार व योग प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवण्याकरता संस्थेला अधिकृत मान्यता दिलेली आहे.

### केंद्रशासन मान्यता:

संपूर्ण भारतभर योगाचा प्रचार व्हावा, या उद्देशाने भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने आयुष चे अंतर्गत एक योजना सुरू केली आहे. देशातील प्रत्येक राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक ङ्कजिल्हा योग कल्याण केंद्रङ्क सुरू केले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये संपूर्ण देशात १०० योग केंद्र सुरु केलेली असून नासिक जिल्ह्यासाठी फक्त योग विद्या गुरूकुल या संस्थेला मान्यता मिळालेली आहे. या मान्यतेच्या माध्यमातून नागरिकांसाठी योगविषयक अनेक उपक्रम राबविले जातात.

### संशोधन विभाग :

विश्व योग दर्शन आश्रमांत संशोधनासाठी अद्ययावत प्रयोगशाळा असून तेथे व अन्य शाखातूनही योग विषयक निरनिराळे संशोधनात्मक प्रयोग सतत चालू असतात. या प्रकल्पांचे सादरीकरण संस्थेच्या व भारतातील इतर निरनिराळ्या संस्थांच्या संमेलनातूनही वारंवार केले जाते.

## योग विद्या गुरूकुलचे शासन मान्यता प्राप्त अभ्यासक्रम

(महाराष्ट्र शासन संदर्भ क्रमांक-संकीर्ण २००९/ ८१९२/०९/ प्राशि-५ दि.२५/८/२००९)

**✻ योगशास्त्र प्रमाणपत्र वर्ग ( योग प्रवेश व योग परिचय)**
प्रवेश पात्रता : १० वी. उत्तीर्ण वय : १८ वर्षे पूर्ण
Certificate Course in Yogic Sciences (C.Y.Sc.)

**✻ योगशास्त्र पदविका वर्ग ( योग प्रबोध व योग प्रवीण)**
प्रवेश पात्रता : योगशास्त्र प्रमाणपत्र उत्तीर्ण वय : २१ वर्षे पूर्ण
Diploma Course in Yogic Sciences (D.Y.Sc.)

**✻ योगशास्त्र पदवी वर्ग ( योग पंडित)**
प्रवेश पात्रता : योगशास्त्र पदविका उत्तीर्ण वय : २१ वर्षे पूर्ण
Degree Course in Yogic Sciences (B.Y.Sc.)

---

**✻ योग प्रशिक्षण प्रमाणपत्र ( योग सहशिक्षक)**
प्रवेश पात्रता : १० वी. उत्तीर्ण वय : १८ वर्षे पूर्ण
अभ्यासक्रम : योग प्रवेश + योग मार्गदर्शक (कालावधी : १५० तास )
Certificate Course in Yoga Education (C.Y.Ed.)

**✻ योग प्रशिक्षण पदविका ( योग शिक्षक)**
प्रवेश पात्रता : १२ वी. उत्तीर्ण वय : २१ वर्षे पूर्ण
अभ्यासक्रम : योग प्रवेश + योग परिचय + योग शिक्षक( कालावधी : २५० तास)
Diploma Course in Yoga Education (D.Y.Ed.)

**✻ योग प्रशिक्षण पदवी ( योग अध्यापक)**
प्रवेश पात्रता : कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण वय २५ वर्षे पूर्ण
अभ्यासक्रम : योग शिक्षक + योग प्रबोध + योग अध्यापक ( कालावधी : एकूण ६०० तास )
Degree Course in Yoga Education (B.Y.Ed.)

# MORARJI DESAI NATIONAL INSTITUTE OF YOGA

(An autonomous organization under Deptt. of AYUSH, Ministry of Health & F. W., Govt. of India)
68, Ashok Road, Near Gole Dak Khana, New Delhi – 110 001
Phone: 23721472 (Extn.104) Telefax – 23351868, 23711657
E-Mail: mdniy@yahoo.co.in Website: www.yogamdniy.nic.in


No.73/03/2010-11/MDNIY/DYWC/NGO
Dated: 21st March, 2011

To,

Yoga Vidya Gurukul,

Yoga Bhavan, College Road,

Nasik-422005 (Maharashtra)

**Subject:** **Selection of NGOs for financial assistance to establish "Swami Vivekananda District Yoga Wellness Centre" (SVDYWC) under Public Private Partnership.**

Sir,

With reference to your proposal received vide letter/application No.Nil dated Nil it is brought to your kind notice that the centres being established under this scheme which were initially named as District Yoga Wellness Centre have been renamed as **"Swami Vivekananda District Yoga Wellness Centre" (SVDYWC).**

It is further to be informed that your NGO viz. **Yoga Vidya Gurukul, Yoga Bhavan, College Road, Nasik-422005** has been provisionally selected for financial assistance to establish "Swami Vivekananda District Yoga Wellness Centre" (SVDYWC) under Public Private Partnership for **"District Nasik"** on all the terms and conditions as mentioned in the scheme for District Yoga Wellness Centre **(copy enclosed at Annexure-'A')**. The Centre shall establish the proposed infrastructure and recruit the staff so that SVDYWC should start functioning at the earliest date.

Therefore, you are requested to furnish the following immediately for further necessary action to sanction the financial assistance to your NGO:-

Execute a "Bond" on a Non-Judicial Stamp Paper of Rs.100/- in the prescribed proforma at **Annexure-'B'** duly attested by the Magistrate/Oath Commissioner.

You are requested to acknowledge the receipt of this letter along with your acceptance to abide by all the terms and conditions **(copy enclosed at Annexure-'F')** immediately.

This issues with the approval of the Director.

Yours sincerely,

( D.K. Malik )

Office Superintendent